# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक – 25.07.2024** **वार – गुरुवार**

---

**पुणे पाऊस**

पुणे शहर आणि परिसराला मुसळधार पावसानं अक्षरशः झोडपून काढलं. मंगळवार रात्रीपासून सुरू असलेली पावसाची संततधार आणि धरणातून सुरू असलेला विसर्ग यामुळे आज शहरातील काही भागात पूरसदृश परिस्थिती निर्माण झाली. सिंहगड रस्ता, डेक्कन परिसर, कात्रजसह शहरातील अनेक भागात सकाळी मोठ्या प्रमाणावर पाणी साचलं होतं, अनेक घरात, इमारतींमध्ये, दुकानांमध्ये पाणी शिरलं. ठीकठिकाणी झाडं पडली. पूरपरिस्थितीमध्ये अडकलेल्या नागरिकांना सुखरूप बाहेर काढण्यासाठी लष्कराला पाचारण करण्यात आलं असून 85 जवानांची तुकडी सिंहगड रस्ता, एकता नगर परिसरात मदत कार्य करत आहेत. एनडीआरएफ आणि अग्निशमन दलाच्या तुकड्याही नागरिकांना सुरक्षित बाहेर काढण्यासाठी अथक प्रयत्न करत आहेत. पुणे अग्निशमन दालने आज सकाळपासून आत्तापर्यंत जवळपास 250 नागरिकांची पुराच्या पाण्यातून सुटका केली आहे. येरवडा, आदर्शनगर इथं पाण्यात अडकलेल्या 10 नागरिकांची दलानं सुखरुप सुटका केली आहे. पुलाची वाडी पाटील इस्टेट झोपडपट्टी आणि आदर्श नगर इथंही पाणी शिरल्याने तिथल्या सुमारे साडेतीनशे नागरिकांना सुरक्षित स्थळी हलवण्यात आलं आहे.

दरम्यान केंद्रीय राज्य मंत्री मुरलीधर मोहोळ यांनी सकाळी प्रशासकीय अधिकाऱ्यांची चर्चा करून पूर परिस्थितीचा आढावा घेतला, मोहोळ दिल्लीहून पुण्याकडे निघाल्याचं वृत्त आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि देवेंद्र फडणवीस यांनीही मुंबईतील नियंत्रण कक्षातून पुण्यातील या पूरपरिस्थितीचा आढावा घेतला. त्यानंतर अजित पवार पुण्यात दाखल झाले असून त्यांनी आधी महापालिकेच्या अधिकाऱ्यांकडून माहिती घेतली, त्यानंतर प्रत्यक्ष घटनास्थळी जाऊन परिस्थितीची पाहणी केली, अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना दिल्या तसंच नागरिकांच्या समस्याही जाणून घेतल्या.

नैसर्गिक संकटाच्या काळात सर्व यंत्रणा, स्वयंसेवी संस्था, आणि लोकप्रतिनिधींनी एकत्रितपणे मदत कार्यात सहभागी व्हावं, असं आवाहन अजित पवार यांनी केलं आहे. पुरामुळे प्रभावित झालेल्या भागातील नागरिकांना अन्न आणि पाणी देण्याचे निर्देश त्यांनी दिले. नागरिकांनी आवश्यक असेल तरच घराबाहेर पडावं आणि पुढचे दोन दिवस धोकादायक पर्यटन स्थळांवर जाऊ नये, असं आवाहन पवार यांनी केलं आहे.

पिंपरी चिंचवड शहर आणि परिसरातही आज मुसळधार पाऊस सुरू असून महापालिकेची आपत्कालीन यंत्रणा युध्दपातळीवर काम करत आहे. नदीकाठी राहणाऱ्या रहिवाशांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. लवासामध्ये दोन बंगल्यांवर दरड कोसळली असून चारजण बेपत्ता असल्याचं वृत्त आहे.

मुसळधार पावसामुळे आज शाळा महाविद्यालयांना सुटी जाहीर करण्यात आली होती. पावसामुळे बारावीच्या पुनर्परीक्षेला पोहचू न शकलेल्या परिक्षार्थीसाठी पुन्हा परीक्षा होणार असल्याची माहिती उपमुख्यमंत्री अजित पवार आणि केंद्रीय राज्य मंत्री मुरलीधर मोहोळ यांनी दिली आहे. दहावी आणि बारावीच्या विद्यार्थ्यांची उद्या होणारी पुरवणी परीक्षादेखील पुढे ढकलण्यात आली आहे.

डेक्कन जिमखाना परिसरात पुलाची वाडी इथं काल रात्री विजेचा धक्का लागल्याने तिघांचा मृत्यू झाला. मृतांच्या नातेवाईकांना राज्य शासनातर्फे मदत केली जाईल असा आश्वासन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिलं आहे. फडणवीस यांनी आज दूरध्वनीवरून या दुर्घटनेतील मृतांच्या नातेवाईकांशी संपर्क साधून त्यांचं सांत्वन केलं. भारतीय जनता पक्षाचे पुणे

शहराध्यक्ष धीरज घाटे यावेळी उपस्थित होते. अतिवृष्टीमुळे निर्माण झालेल्या पूरस्थितीत पुणेकरांना मदत करण्यासाठी पुणे शहर भाजपच्या कार्यालयासह शहरातील सर्व खासदार आणि आमदारांची कार्यालयं पुढचे आठ दिवस मदत केंद्र म्हणून 24 तास खुली राहातील अशी माहिती धीरज घाटे यांनी दिली आहे.

खडकवासला धरणातून मुठा नदीपात्रात सुरू असलेला पाण्याचा विसर्ग आज सकाळी 15 हजार क्युसेक पर्यंत कमी करण्यात आला होता, तो आता सहानंतर पुन्हा 40 हजार क्युसेकपर्यंत वाढवण्यात येणार आहे. दरम्यान आज दुपारनंतर पुण्यातील पावसाचा जोर काहीसा कामी झाला होता, पण आता पुन्हा पावसाला सुरुवात झाली आहे, उद्याही मुसळधार ते अतिमुसळधार पावसाचा इशारा हवामान विभागानं दिला आहे.

**<u>ससून</u>**

ससून रूग्णालयातील अस्थिरोग विभागातून रूग्णाला बेवारस सोडून दिल्याप्रकरणी याच विभागातील प्रमुख डॉ. प्रवीण लोंढे यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे. विभागप्रमुख डॉ. गिरीश बारटक्के यांच्याकडेही चौकशी करण्यात येत आहे.

**<u>झिका</u>**

पुणे शहरात झिकाचा प्रार्दुभाव वाढत असून आणखी एका गर्भवती महिलेला झिकाची लागण झाली आहे. आता झिका रूग्णांची संख्या 36 झाली आहे.

**<u>पुणे मनपा</u>**

पुणे महापालिकेच्या आरोग्य प्रमुखपदी डॉक्टर नीना बोराडे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. डॉ बोराडे नांदेड इथं जिल्हा माता बाल संगोपन अधिकारी म्हणून काम पाहत होत्या.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**